**अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना अंशदायी योजना लागु करण्याबाबत

**(१) २८४० (०२-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ८७ ला दिनांक १३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची अंशदायी पेन्शन योजनेची खाती उघडण्यात आली असून त्यांच्या खात्यावर त्यांच्या व शासनाच्या हिश्श्याची रक्कम जमा करुन त्यांना हिशोबाच्या पावत्या देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये रूपांतरण करण्यात आले असून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये शासनाकडून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना धारक शिक्षकांना १४ टक्के शासनाचा हिस्सा जमा करण्याचा शासन आदेश असून शासनाचा १४ टक्के हिस्सा राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना धारक शिक्षकांच्या खात्यामध्ये जमा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमधील खातेधारकांची नावे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये (NPS) समाविष्ट करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच एनपीएसधारक शिक्षकांच्या खात्यामध्ये शासनाचा १४ टक्के हिस्सा जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१) अंशत: कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उर्वरित पावत्या देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरिष्ठ महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरणेबाबत

**(२) २८४७ (२८-०५-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३३ ला दिनांक ६ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरिष्ठ महाविद्यालयातील सन १९९१ ते २००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राह्य धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार संबंधित याचिकाकर्त्यांना त्यांच्या सेवा ग्राह्य धरुन सर्व लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयात न गेलेल्या त्या इतर समान अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियुक्ती दिनांकापासून ग्राह्य धरुन अनुषंगिक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२५-०८-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सन १९९१ ते २००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट धारक अध्यापकांनी नेट/सेट अर्हता ज्या दिवशी धारण केली आहे, त्या दिनांकापासून त्यांच्या सेवा सर्व अनुषंगिक लाभासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या आहेत. उक्त कालावधीत नेट/सेट अर्हता धारण न करणाऱ्या अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय, दिनांक २७/०६/२०१३ अन्वये शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धरण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुषंगिक लाभ देय आहेत.

तथापि, उक्त कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट धारक काही अध्यापकांनी त्यांना निवृत्तीवेतन मिळण्यासाठी मा.न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. सदरहू याचिकांपैकी याचिका क्र.१३१६६/२०१७ मध्ये मा.न्यायालयाने याचिकाकर्ते यांना निवृत्तीवेतन सुरू करण्याबाबत आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार सदर आदेशाची अंमजबजावणी करण्यात आली आहे. मा.न्यायालयाने विशिष्ट प्रकरणी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. तथापि, बिगर नेट/सेट बाबत धोरणात्मक निर्णयासाठी बरीच प्रकरणे मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असून त्यामध्ये आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्राध्यापकांचे विविध प्रश्न सोडविण्याबाबत**

**(३) २८४९ (०२-०६-२०२०). श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांबाबत मराठवाडा शिक्षक लोकप्रतिनिधी व प्राध्यापक संघटना प्रतिनिधी यांच्यासोबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांसह माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत मा.मंत्री महोदयांनी प्रश्न निकाली काढण्यासाठी संबंधित सचिवांना दिलेल्या निर्देशानुसार शासनाने कोणकोणते निर्णय घेतले आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२५-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाने दिनांक ०२/११/२०१७ रोजीचे पत्र निर्गमित केल्यानंतर पीएच.डी/एम.फिल च्या आगाऊ वेतनवाढी लागू करणे तसेच प्राचार्य पदाची वेतनश्रेणी स्तर १४ मध्ये निश्चित करण्याच्या अनुषंगाने सुधारित आदेश/सूचना निर्गमित केलेल्या आहेत किंवा कसे याबाबत केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालय यांचेकडून तात्काळ माहिती उपलब्ध करुन घेऊन शासनास सादर करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील मेयो रूग्णालयाच्या इमारतीबाबत**

**(४) २९६३ (२९-०५-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मेयो रुग्णालयामधील जीर्ण झालेल्या वॉर्डामुळे रूग्ण सोईपासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयामधील जीर्ण झालेल्या वॉर्डाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लेखापरीक्षण होऊन त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करणे व इमारत दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२७-०८-२०२०) :** (१) सदर रुग्णालयातील बऱ्याच इमारती जवळपास १३५ वर्ष जुन्या असून जीर्ण अवस्थेत असल्यामुळे सुरक्षेच्यादृष्टीने या इमारतीमधील रुग्ण संस्थेतील सुस्थितीत असलेल्या इतर रुग्ण कक्षांमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत.

(२) सदर संस्थेचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व्हीएनआयटी या शासकीय संस्थेव्दारे करण्यात आलेल्या लेखा परिक्षणचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(३) या संदर्भात सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संस्थेस भेट दिलेली आहे. याबाबत संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाशी करण्यात आलेल्या चर्चेनुसार शिकस्त इमारतीच्या बळकटीकरणासाठी येणारा खर्च व खर्चाच्या तुलनेत शिकस्त इमारतीचे आयुष्यमान फार जास्त वाढणार नाही, ही बाब निदर्शनास आल्याने सदर इमारती जमीनदोस्त करण्याचे संस्थेव्दारे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि ठाणे) तालुक्यातील कुपोषित बालकांबाबत

**(५) २९९२ (२९-०५-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील आठ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या दोन बालविकास प्रकल्पामध्ये ४२८ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून गरोदर, स्तनदा माता, महिला व छोटया बालकांना घरपोच पोषण आहारामध्ये धान्य पुरवठा करणे तसेच ३ ते ६ वयोगटातील मुलांना आठवड्यातून चार दिवस अंडी व केळी यासारखे खाद्यपदार्थ देणे, त्यांचे वजन, उंची तपासणे, आरोग्य विभागामार्फत लसीकरण मोहिम राबविणे अशी विविध कामे अंगणवाडी सेविकामार्फत होणे आवश्यक आहे, मात्र ती योग्यरित्या करण्यात येत नसल्याने भिवंडी तालुक्यातील ५ गावात ४२८ अंगणवाडी केंद्रांतर्गत ३९४ बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेच्या दिवा अंजूर, कोन, खारबाव, पडघा, अनगाव, दाभाड, वज्रेश्वरी, चिबीपाडा अशी ८ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत २२७ वीटभट्टी कामगारांची मुले आहेत तर स्थलांतरीत कुटुंब संख्या ६ हजार १८० असून ० ते ३ वर्ष वयोगटातील १ हजार ९७० मुले, ३ ते ६ वर्ष वयोगटातील २ हजार २८० मुले आहेत यामध्ये कुपोषणाची लागण झालेले ५२ मुले आहेत तर अतितीव्र कुपोषित ३४२ मुले आहेत ही सर्व मुले तालुक्यातील ५५ गावांमध्ये आढळल्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी व भिवंडी पंचायत समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, वीटभट्टीवरील स्थलांतरीत कामगारांच्या मुलांचे कुपोषण कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०)** : (१) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना खालील सेवा नियमितपणे देण्यात येतात.

अ) ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी व गरोदर स्तनदा माता यांना घरपोच आहार नियमितपणे देण्यात येत आहे.

आ) ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना नियमितपणे गरम ताजा आहार देण्यात येतो.

इ) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्तनदा माता यांना चौरस आहार देण्यात येतो तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ वेळा अंडी, केळी सुध्दा देण्यात येतात.

ई) याव्यतिरिक्त लसीकरण, लाभार्थ्यांचे वजन उंची घेणे इत्यादी कामे सुध्दा अंगणवाडी सेविकांमार्फत नियमितपणे पार पाडण्यात येतात.

वरील सर्वबाबी लक्षात घेता अंगणवाडी सेविकांमार्फत योग्यरित्या कामकाज करण्यात येत आहे. तथापि, कुपोषणाची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

जन्मत: मुलाचे कमी वजन (१५०० ग्रॅम पेक्षा कमी), गरोदरपणातील आरोग्याची काळजी न घेणे, गरोदरपणातील रक्तक्षय व बाळंतपण दवाखान्यात न करणे, प्रसुती दरम्यान व प्रसुती पश्चात निर्माण झालेल्या समस्या, मुलांचे दिर्घ आजार, आहारपणातील उपचाराची तत्परता गुणात्मकता, अशुध्द पाणीपुरवठ, आदिवासी लोकांतील अनिष्ठ रुढी परंपरा व अंधश्रध्दा, गरिबी, कमी वयातील गरोदरपणा, वारंवार गर्भारपण तसेच दोन प्रसुतीमधील अंतर कमी असणे, महिलांमध्ये आरोग्य व पोषण विषयक शिक्षणाचा अभाव, जनजागृतीचा अभाव इत्यादी.

वरील कारणांमुळे भिवंडी तालुक्यातील ५ गावात ४२८ अंगणवाडी केंद्रांतर्गत ३९४ बालके कुपोषित असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी, २०२० च्या अहवालानुसार अतितीव्र कुपोषित बालके ५२ तर मध्यम कुपोषित बालकांची संख्या ५८४ इतकी होती.

(३) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

अ) घरपोच पोषण आहार, कच्चे धान्य पुरवठा करण्यात येत आहे.

आ) बचत गटांमार्फत गरम ताजा आहार देण्यात आलेला आहे.

इ) ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांची वजन, उंची घेतलेली आहे.

ई) पेसा क्षेत्रातील लाभार्थ्यांना अमृत आहार देण्यात येत आहे.

उ) आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात येते.

ऊ) मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत लसीकरण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हयात कोरोना आपात्कालीन परिस्थिती दरम्यान धान्य वाटपात गैरप्रकार झाल्याबाबत

**(६) ३००४ (०२-०६-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आपात्कालीन परिस्थिती दरम्यान परभणी जिल्हयातील गोरगरीब व गरजू नागरीकांना विविध योजनेतून वाटप करण्यात येणाऱ्या गहू, तांदूळ व इतर धान्य वाटपात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी, परभणी तसेच प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मुंबई यांच्याकडे सन २०२० दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात वाटपासाठी आलेले एकूण धान्य तसेच प्रत्यक्षात शिधापत्रिकेवर नोंदवून वितरीत करण्यात आलेले धान्य यात तफावत असल्याने त्या सर्व धान्य वाटप प्रक्रिया, यंत्रणा यांची प्रत्यक्षात मंत्रालय स्तरावरील विशेष दक्षता व भरारी पथक यांच्यामार्फत गावनिहाय, मुद्देनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्य वाटपातील गैरप्रकार व अनियमितता याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी, कर्मचारी, दुकानदार व इतर यंत्रणा यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत तालुकानिहाय सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२७-०८-२०२०) :** (१) होय, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व शिधापत्रिका लाभार्थी यांनी जिल्हाधिकारी परभणी, जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी व तहसिलदार यांच्याकडे रास्तभाव दुकानदारांविरुध्द कोरोना आपात्कालीन परिस्थिती दरम्यान सन २०२० मध्ये निवेदने प्राप्त आहेत.
(२) शासन परिपत्रक, दिनांक १२/०१/२०१२ अन्वये रास्त भाव दुकानांच्या प्रत्येक सहामाही कालावधीत किमान एक व वर्षात किमान दोन तपासण्या करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, शासन पत्र दिनांक २४/०४/२०२० अन्वये रास्त भाव दुकानदारांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी जिल्हास्तरावर भरारी पथके स्थापन करुन त्यामार्फत ४८ तासात प्राप्त तक्रारींची तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी, उपआयुक्त (पुरवठा) व नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

धान्य वाटपाचे अनुषंगाने प्राप्त तक्रारीची चौकशी नायब तहसिलदार, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी केली आहे.

| अ.क्र. | तालुका | प्राप्त तक्रारी | रा.भा.दु. यांच्यावर केलेली कारवाई | |
|---|---|---|---|---|
| | | | निलंबित | अनामत रक्कम जप्त |
| १. | परभणी | ० | ० | ० |
| २. | जिंतूर | ४ | २ | २ |
| ३. | सेलू | १ | ० | १ |
| ४. | पाथरी | १ | १ | ० |
| ५. | मानवत | ० | ० | ० |
| ६. | सोनपेठ | २ | १ | १ |
| ७. | गंगाखेड | ७ | १ | ६ |
| ८. | पालम | ० | ० | ० |
| ९. | पुर्णा | १ | ० | १ |
| | एकूण | १६ | ५ | ११ |

दोषी आढळून आलेल्या रास्तभाव दुकानदारांविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुध्द कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांतील पोषण आहाराचे वाटप बंद असल्याबाबत

**(७) ३०३० (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने अंगणवाड्या बंद केल्याने अंगणवाड्यातील बालकांना घरपोच पोषण आहाराचे धान्य देण्याचे आदेश शासनाने दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यातील लाभार्थी बालकांच्या संख्येनुसार राज्य ग्राहक महासंघाकडे नोंद होऊनही याबाबत निविदा प्रक्रिया राबविली नसल्याने पोषण आहार देण्यात आला नसल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), औरंगाबाद यांनी २० मार्च, २०२० ते १५ मे, २०२० या कालावधीसाठी महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन यांचेकडे दिनांक २३ मार्च, २०२० रोजी ३ ते ६ वयोगटातील ११६२५६ लाभार्थ्यांसाठी मागणी नोंदविली होती व त्यानुसार ११६२५६ लाभार्थ्यांना पुरवठा झालेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाड्यांमधील लाखो बालके उपाशी असल्याबाबत**

**(८) ३०३१ (०२-०६-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालविकास विभागाकडून पोषण आहार न मिळाल्याने राज्यातील अंगणवाड्यांमधील सुमारे ७३ लाख बालके आणि चार लाखाहून अधिक स्तनदा माता व गर्भवतीवर माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान उपाशी राहण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाड्यातील बालकांना व महिलांना अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या बचतगटांचे ३०४ कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याने बचतगट पुरवठा करण्यास तयार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

राज्यात माहे मार्च, २०२० पासून कोविडचा प्रादुर्भाव वाढल्याने ३ ते ६ वर्ष वयोगटातील अंगणवाडीत दिला जाणारा आहार बंद करुन त्याऐवजी THR अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन यांना आदेश देण्यात आले असून त्यांचे मार्फत संपूर्ण राज्यात कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा झालेला आहे. कोणत्याच प्रकारचे लाभार्थी आहारापासून वंचित नाहीत.

(२) हे खरे नाही.

महिला बचत गटांची सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील रुपये ११५ कोटीची देयके प्रलंबित होती. तथापि, माहे एप्रिल व मे,२०२० मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून प्रलंबित देयकांची अदायगी टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. देयके प्रलंबित राहिल्याने कोणत्याही बचतगटांनी काम सोडले असल्याचे कळविले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड, मंडणगड व दापोली (जि.रत्नागिरी) येथील विविध रस्त्यांच्या कामांना मान्यता देण्याबाबत

**(९) ३२६९ (२९-०५-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, मंडणगड व दापोली (जि.रत्नागिरी) येथील विकासकामांना मान्यता देण्याबाबत सातत्याने मागणी होत असून खेड-आंबवली, बिरमणी, हातलोट, पुसद रस्ता (जमीन भूसंपादन), कुडोशी मांडवे, दहिवली, घोगरे रस्ता, मोहाने-देवघर-हुंबरी-वाडी बीड नांदिवली, सुसेरी, दयाळ, फुरुस, पोयनार, पिसई, अडखळ, पाज, सालदुरे, मुरुड, कर्दे, लाडघर इत्यादी रस्त्यांच्या कामांसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्रव्यवहार करून मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्हयातील तळे बंदरवाडी घेरारसाळगड रस्ता, शिवतर कोंडवाडी जांभुळवाडी रस्ता, भिलारे आयनी खोतवाडी खांबेवाडी रस्ता, कुणबीवाडी (चिनकटेवाडी) खेड ग्रामीण रस्ता, खवटी मंडलीकीककोंड सातपाने रस्ता इत्यादी रस्त्याच्या कामासाठी ही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न भाग १ मधील सर्व रस्ते नियमित देखभाल व दुरूस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून त्या रस्त्यांवरील मागणी केलेली सर्व कामे योजनेत्तर तसेच योजनांतर्गत कार्यक्रमातून मंजूर करण्यात आलेली आहेत. तसेच प्रश्न भाग २ मधील सर्व रस्ते ग्रामीण मार्ग असून सदर ५ कामांपैकी ४ कामे ग्रामविकास व पंचायत राज विभागाकडून २५१५ योजनेंतर्गत मंजूर आहेत. सद्य:स्थितीत वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अर्थसं २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनांक ४/५/२०२० च्या मुद्या क्र. १३ अन्वये सर्व बांधकामे स्थगित करण्यात आली आहेत.

---

## खेड, मंडणगड व दापोली (जि.रत्नागिरी) येथील विविध लहान व मोठ्या पुलांचे बांधकाम तसेच पुनर्बांधणीच्या कामांना मान्यता देण्याबाबत

**(१०) ३२७० (०३-०६-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, मंडणगड व दापोली (जि.रत्नागिरी) येथील विविध विकासकामांना मान्यता देण्याबाबत सातत्याने मागणी होत असून चाकाळे, चिंचघर, दरम्यान नारंगी नदीवर पुल बांधणे, मोहाने, देवघर, हुंबरी, वाडीबीड, नांदिवली रस्ता

येथील कमकुमत पुलाचे बांधकाम करणे, मुरडे तिसे येथील कॉजवेच्या ठिकाणी पुलाचे बांधकाम करणे, पुरे बुद्रुक जोडरस्ता ग्रामा ३४१ वर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, तळे बंदरवाडी रस्ता ग्रामा २१८ येथे कॉजवेच्या ठिकाणी उंच पातळीच्या मोठ्या पुलाचे बांधकाम करणे तसेच लहान व मोठ्या पुलांच्या बांधकाम व पुनर्बांधणीच्या विकास कामांना नाबार्ड-२५ मध्ये समाविष्ट करणे इत्यादी रस्त्यांच्या कामांसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाकडे पत्रव्यवहार करुन मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सुसेरी दयाळ फुरुस पोयनार पिसई ते.रा.मा.९७ रस्ता येथील पुलाची पुनर्बांधणी करणे, कुडोशी मांडवे दहिवली घोगरे रस्ता प्रजिम-१६ येथील पुलांची पुनर्बांधणी करणे, चिंचघर तिसे जामगे, सोनारवाडी, सिमेचीवाडी, जामगे बौध्दवाडी पुलाचे रुंदीकरण करणे, खेड भरणे, आंबवली बिरमणी ते जिल्हा हद्दीपर्यंत अरुंद मोठ्या पुलाची पुनर्बांधणी करणे, मोहाने देवघर हुंबरीवाडी बीड, नांदिवली रस्ता येथील पुलाचे बांधकाम करणे इत्यादी लहान व मोठ्या पुलांच्या बांधकाम व पुनर्बांधणीच्या विकास कामांचा अर्थसंकल्पांमध्ये समाविष्ट करणेबाबत ही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त विकास कामांना मान्यता मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२२-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नांकित पुलांपैकी दोन पुलाची कामे अर्थसंकल्पात व एक काम हे नाबार्ड-२५ अंतर्गत मंजूर करण्यात आले आहे व उर्वरीत पुलांची कामे ही निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## बुलढाणा जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ३३३५ (२९-०५-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेमध्ये गट “अ” व गट “ब” ची पदे (महाराष्ट्र विकास सेवेतील पदे वगळून) वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंचन विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग, शालेय शिक्षण विभाग व इतर विभागातील पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी वर्ग-२, उपअभियंता वर्ग-२, उपअभियंता (स्थापत्य) वर्ग-२, तालुका आरोग्य अधिकारी गट-अ, वैद्यकीय अधिकारी गट-ब तसेच पशुधन अधिकारी गट-अ, गट शिक्षणाधिकारी वर्ग-२, मुख्याध्यापक गट-२, अधीक्षक (राजपत्रित), समाजकल्याण अधिकारी व बालविकास प्रकल्प अधिकारी ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागातील पदे रिक्त असल्यामुळे कोविड-१९ या महामारीमध्ये आरोग्य विभागावर कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बुलढाणा जिल्हा परिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०८-२०२०) : (**१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) वै.अ.गट-अ मधील १०५ मंजूर पदांपैकी ४७ पदे कंत्राटी स्वरुपाची असून सदर पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावरील निवड समितीमार्फत भरण्यात आलेली आहेत व उर्वरित सर्व पदे भरण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## अकोला शहरातील विमानतळाकरीता भूसंपादन करण्याबाबत

**(१२) ३५३८ (०३-०६-२०२०). डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११४१ ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा (शहर) येथे स्थानिक विमानतळाकरीता भूमि अधिग्रहण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासनाकडे सादर केल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी संयुक्त मोजणीअंती सुमारे २२.२४ हे.आर. जमीन संपादनाची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले असून या भूसंपादनासाठी शासनस्तरावर प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, अकोला (शिवणी) विमानतळ हे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या विमानतळाच्या सध्याच्या १४०० मीटर धावपट्टीवरुन ATR-४२ विमानसेवा सुरु करण्याबाबत करण्यात आलेल्या पाठपुराव्यानुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे तसेच सदर विमानतळाकरीता भूसंपादन करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२६-०६-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी २२.२४ हे.आर. भूसंपादनापूर्वी प्रथमत: त्याबाबतचा व्यवहार्यता अहवाल तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस देण्यात आलेल्या आहेत.

(३) अकोला विमानतळावरुन ATR-४२ प्रकारची विमानसेवा सुरु करण्याबाबत भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने कळविले आहे की, ATR-४२ प्रकारची विमानसेवा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत DGCA च्या परवान्यानुसार सुरु होऊ शकेल. याच्यापेक्षा मोठ्या प्रकारच्या विमानांकरीता अतिरिक्त २२.२४ हे.आर. जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोसबी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील नळपाणी योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१३) ३६३३ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोसबी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे भारत निर्माण योजनेतून नळपाणी योजनेच्या कामास मंजूरी मिळूनही सदरहू योजनेचे काम मागील १३ वर्षात पूर्ण झाले नसून फक्त कागदोपत्री काम पूर्ण झाल्याचे दाखविण्यात येत असल्याने सदरहू कामामध्ये निधीचा गैरव्यवहार झाल्यामुळे याप्रकरणी चौकशी करून दोषींविरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी लेखी निवेदनाव्दारे केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी चौकशीचे आदेश देऊन गुहागर गटविकास अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये नियुक्ती करुन तात्काळ अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदेश देवून १ वर्ष पूर्ण होत असूनही कोणताही अहवाल सादर झाला नसून कोणावरही कारवाई झाली नसल्यामुळे दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी येथील ग्रामस्थांनी उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या चौकशी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या गटविकास अधिकारी, गुहागर यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कोसबी येथील सरपंचांनी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, जिल्हाधिकारी, रत्नागिरी व मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नळपाणी योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषींविरोधात कारवाई करून सदरहू योजना कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१८-०८-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोसबी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील भारत निर्माण योजनेचे काम कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आलेले नाही. कोसबी नळ पाणीपुरवठा योजना ही गुहागर तालुक्यातील नसून चिपळूण तालुक्यातील आहे. सदर योजनेच्या कामाची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गुहागर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी लेखी निवेदन दिलेले आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी गटविकास अधिकारी, गुहागर यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. तसेच सदर अहवालासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रत्नागिरी यांच्याकडून दिनांक ०७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक अभिप्राय प्राप्त झाले आहेत.

प्राप्त चौकशी अहवाल व तांत्रिक अभिप्राय विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अजनुप (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे सुरळीत पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत

**(१४) ३६४५ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजनुप (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या माळ आदिवासी वस्तीतील पारधीपाडा व खोरगडे पाड्यासाठी लाखो रूपये खर्चुन राबविलेली पाणीपुरवठा योजना ठेकेदार व ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ७ दिवसातच बंद पडल्याने नागरिकांना पाण्यासाठी तीन-चार किमी खोल दरीत पायपीट करून जावे लागत असून खड्ड्यातील पाणी तळाला गेल्याने आदिवासी रहिवाश्यांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याने रहिवाश्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्य वैतरणा धरणाजवळ जाण्यासाठी रस्ता नसल्याने दोन हजार फूट खोल दरीत उतरून डबक्याचे पाणी आणावे लागत असल्याने त्याठिकाणी रस्ता बनविल्यास येथील पाणीटंचाई कायमची दूर होईल असे स्थानिक आदिवासींचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पाणीपुरवठा योजना राबविताना पाणी उचलताना एक इंच पाईप लावण्यात आला असून त्याच्यापुढे दोन इंच पाईपलाईन जोडली आहे, याबाबत पाणीपुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप पंचायत समितीच्या सदस्यांनी केला आहे, तसेच ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे पाड्यापर्यंत पाणी पोहचत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन पाणीपुरवठा योजनेतील सर्व त्रुटी दूर करून विनाविलंब नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२५-०८-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अजनुप ग्रामपंचायत अंतर्गत पारधीपाडा व खोरागडे येथील आदिवासी वस्ती ही पठारावरील उंच डोंगरावर वन जमिनीत वसलेली असून सदर ठिकाणी रस्ते, वीज यापैकी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे तेथे योजना करणे आजपर्यंत शक्य झालेले नाही. सदरचे पाडे मध्य वैतरणा धरणाजवळील उंच डोंगरावर वसलेले आहेत. त्यामुळे त्यांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी दरीत उतरून खाली यावे लागते. धरणाजवळ मुबलक पाणी उपलब्ध असल्यामुळे डबक्यातून पाणी आणावे लागण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदरच्या पाड्यांची वेळोवेळी पाहणी केली असता, सौरऊर्जेवर आधारीत योजना करण्याचे प्रयत्न केले असता धरणाचा पाणीसाठा दरीत खोलवर व वस्ती उंच डोंगरावर वसली असल्याने विद्युत पंपाशिवाय पाणी चढविणे शक्य नाही, असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे इतर पर्यायांचा विचार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा ते ब्रम्हपुरी (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१५) ३६७१ (०३-०६-२०२०). श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा ते ब्रम्हपुरी (जि.सोलापूर) या राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून या कामात मुरूम, खडी ऐवजी पांढऱ्या, काळ्या व तांबड्या मातीचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकरी, राजकीय पक्ष, राजकीय संघटना व सामाजिक संघटना यांच्याव्दारे अनेकदा आंदोलने करण्यात आली असूनही उक्त निकृष्ट दर्जाचे काम सुरूच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कारवाई करुन सदर रस्त्याचे काम उत्कृष्ट प्रतीचे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२०-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सदर काम MORTH Specification व भारतीय रस्ते Congress च्या व IRC SP:८४-२०१४ मॅन्युअलप्रमाणे प्रगतीत असून स्वतंत्र अभियंत्याच्या देखरेखीखाली करण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांचेकडून कळविण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी शेतकरी व राजकीय संघटनेची निवेदने/तक्रारी उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांचेमार्फत प्राप्त झालेल्या असून त्यानुसार सदर ठिकाणी स्वतंत्र अभियंता मार्फत पुन:श्च चाचणी घेण्यात आली असता सदर ठिकाणचे काम MORTH व IRC च्या मानकानुसार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हा नियोजन समितीमार्फत नगरविकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) ३७२९ (०२-०६-२०२०). श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक २२४० ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षातील जिल्हा नियोजन समितीमार्फत नगरविकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याची बाब जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आली असता सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणाच्या चौकशीसाठी अपर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली देखील एक स्वतंत्र चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समित्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, उक्त अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच अहवालातील शिफारसीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०८-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित समित्यांचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना प्राप्त झालेला आहे.

अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार तत्कालीन जिल्हा प्रशासन अधिकारी तथा तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना यापुर्वीच म्हणजे दिनांक २९/०१/२०२० रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.

अप्पर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानुसार चौकशीतील मुद्यांच्या अनुषंगाने संबंधितांना नोटीस दिलेल्या असून खुलाश्याअंती दोषी असणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१७) ३८५२ (१६-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा लाभ देण्यासाठी शासनाने आश्वासित प्रगती योजना लागू केली असून सदर योजनेंतर्गत २४ वर्षाच्या सेवेनंतर मिळणारा दुसरा लाभ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी शासनाने कोणतेही आदेश न दिल्याने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने नियमानुसार मिळणारा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे आदेश पारीत केले असून न्यायालयीन आदेशानुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित सेवा अंतर्गत प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाने आदेश न देण्याची कारणे काय आहेत, याबाबतचे आदेश केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१), (२) व (३) राज्यातील खाजगी अनुदानित शाळामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दिनांक ३०/४/१९९८ अन्वये केवळ १२ वर्षाच्या सेवेनंतर देय असणारी कालबद्द पदोन्नती योजना लागू आहे. २४ वर्षाच्या सेवेनंतर देय असणारी आश्वासित प्रगती योजना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप लागू करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३३४/२०१८ मध्ये दिनांक ४/१०/२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयात विधी व न्याय विभागाने दिलेल्या परवानगीनुसार पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. यानुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका क्र. ६३२३/२०१८ व याचिका क्र. ८४३९/२०१८ मध्ये दिनांक १५/७/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाविरूध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील + २ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे दोन्ही निर्णय रद्द करण्याबाबत

**(१८) ३८५३ (१६-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील २ स्तरावरील आधारीत एचएससी व्होकेशनल व दिल्ली अभ्यास क्रमाकडील पूर्ण वेळ शिक्षक यांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी व्होकेशनल इन्स्ट्रक्टर्स टिचर्स असोसिएशनतर्फे दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी विधीमंडळावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार ४६०० ग्रेड पे मंजूर करण्यात यावा, व्यवसाय अभ्यासक्रमाचे रुपांतरण व निरीक्षण रद्द करावे या प्रमुख मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२७-०७-२०२०) :** (१) इन्स्ट्रक्टर्स टीचर्स असोसिएशन तर्फे दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी विधीमंडळावर मोर्चा काढण्याबाबत निवेदन दिले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विभागाच्या दिनांक १६ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणीपुरवठा विभागात नियमबाह्य निविदा प्रक्रिया राबविल्याबाबत

**(१९) ३८५९ (१७-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणीपुरवठा विभागात श्री.विजय टाकळीकर, कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असून त्यांच्या कार्यकाळात त्यांनी निविदा प्रक्रिया राबवून करोडो रूपयांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन पाठवून मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २६ जून, २०२० रोजी दैनिक सकाळ व देशोन्नती नागपूर या वृत्तपत्रातसुध्दा नागपूर जिल्हा परिषदेचे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता, श्री.विजय टाकळीकर व त्यांच्या खाजगी कार चालकास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने २ लाख रूपयाची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या नागपूर जिल्हा परिषदेचे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता, श्री.विजय टाकळीकर यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) श्री.विजय टाकळीकर व त्यांचा कार चालकास लाचलुचपत पथकाने २ लाख रुपयाची लाच स्वीकारताना पकडले हे खरे आहे.
(३) लाचलुचपत विभागाने कारवाईचे अनुषंगाने मा.सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई ह्यांचे आदेश क्र.एससीबी-१/२०२०/ श्री.टाकळीकर/नागपूर आ-२(विचौ)/दिनांक १०/०७/२०२० अन्वये श्री.विजय टाकळीकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प., नागपूर ह्यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यात टँकर पुरवठ्यामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२०) ३८६३ (१७-०७-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात सन २०१९ मध्ये टँकरच्या बोगस खेपा दाखवून शासकीय देयके काढण्यात आल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त टँकरव्दारे दिनांक १२ ते १६ मेच्या कालावधीत वाघुर्डे खुर्द गावाला पाणीपुरवठा केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषी ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (३१-०७-२०२०) :** (१) व (२) या आशयाची तक्रार माहे जून, २०२० मध्ये जिल्हा प्रशासनास प्राप्त झाली आहे.
(३) प्राप्त तक्रारीबाबत जिल्हास्तरावर तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करण्याबाबत

**(२१) ३८७८ (१५-०७-२०२०). श्री.कपिल पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.नागोराव गाणार, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली आहे, तसेच, दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान पेन्शन योजना लागू केली असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या नियुक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देण्याबाबत शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी अनुदानित, विनाअनुदानित अंशत: अनुदानित व तुकड्यांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत दिनांक २५ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये नेमलेल्या अभ्यास समितीस ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनही या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यास समितीचा अहवाल शासनास वेळेत प्राप्त न झाल्यामुळे सेवानिवृत्ती नंतर वृध्दापकाळातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाहाचा आधार हिरावून घेतला असल्याने नागपूर येथे राज्यातील शिक्षक व त्यांच्या संघटनेमार्फत जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतच्या मागणीकरीता माहे डिसेंबर, २०१९ मध्ये आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी आणि इतर सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना अभ्यासगटाकडून अहवाल घेवून जुनी पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०६-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे. अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) या अभ्यास गटाने दिनांक ३/७/२०२० रोजी अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्यावर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या खाजगी विकासकांकडील थकबाकी वसूल करण्याबाबत

**(२२) ३८९१ (१६-०७-२०२०). श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२०२ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या पुनर्विकास योजनांमध्ये सहभागी असलेल्या खाजगी विकासकांकडील थकबाकीची रक्कम १६७ कोटी रुपयांवर गेली असल्याचा अंदाज वर्तविण्यात आल्यानंतर याचा उलगडा होण्यासाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून विशेष मोहिम हाती घेतली असता त्यात ४४ विकासकांकडील थकबाकीची रक्कम १६६ कोटी ९२ लाख रुपये असल्याचे स्पष्ट झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकबाकीदार विकासकापैकी १२ विकासकांविरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे मंडळाकडून तक्रार दाखल करण्यात आली असून विकासकांना काम थांबवा नोटीस दिल्यानंतर माहे एप्रिल, २०१६ ते माहे मार्च, २०१९ पर्यंत रक्कम रुपये ८५.११ कोटी व चालू वर्षामध्ये माहे एप्रिल, २०१९ ते ३१ जानेवारी, २०२० दरम्यान रुपये १८.०३ कोटी रक्कम अशी एकूण रुपये १०३.१४ कोटी वसुल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित मंडळाकडून पॅनल वकील यांना कळविण्यात आले होते त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, विकासकाने थकीत रक्कमेचा भरणा न केल्यामुळे म्हाडामार्फत विकासक करीत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पास काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) देण्यात आल्या असून म्हाडा अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कारवाई करणेस्तव विकासक यांचे बँक खात्यांचा तपशिल व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विकासक यांचे जंगम व स्थावर मालमत्तेबाबतचा तपशिल अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विकासकांकडील उर्वरित थकबाकी विनाविलंब वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (१९-०८-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
(२) होय, हे खरे आहे.
(३) विकासकांकडील संक्रमण गाळ्यापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकील यांना कळविण्यात आले आहे. यापैकी विकासक मे.एस.डी.कॉर्पोरेशन यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच विकासक मे.वर्धमान डेव्हलपर्स व विकासक मे.आर.आर. बिल्डर्स यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयाकडे दाखल करावयाच्या Recovery Civil Suit चा मसूदा (Draft) विधी विभागाकडे अभिप्राय/ तपासणीकरीता म्हाडा प्राधिकरणाव्दारे पाठविण्यात आला आहे. उर्वरीत विकासक यांचेविरुध्द मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याबाबत पॅनल वकील यांच्याकडे आवश्यक ते दस्तऐवज पुरविण्यात आले असून कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदरचे काम पूर्ण होऊ शकले नसल्याचा म्हाडा प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) संक्रमण गाळयांच्या भाड्याची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुध्द म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्याकरीता विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्ताबाबतचा तपशिल सादर करण्याबाबत

जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना म्हाडा प्राधिकरणानुसार दिनांक २९/०९/२०१७ अन्वये व तसेच दिनांक १९/०७/२०१८ च्या पत्रान्वये माहिती मागविण्यात आली असून ती अद्याप पर्यंत अप्राप्त आहे. तसेच सर्व विकासकांना मंडळामार्फत थकीत रक्कमेचा भरणा त्वरीत करण्याबाबत प्राधिकरणाव्दारे कळविण्यात आले आहे.
(५) थकबाकीदार विकासक यांचेविरुध्द मा.न्यायालयामध्ये Recovery Civil Suit दाखल करण्याची कार्यवाही सुरु असून थकबाकीदार विकासक यांचे ताब्यातील संक्रमण गाळे मंडळाचे ताब्यात घेण्याकरीता विशेष मोहिमेंतर्गत प्राधिकरणाद्वारे पथक स्थापक करण्यात आले आहे. परंतु कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सदरची मोहिम राबविणे शक्य झाले नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषा सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२३) ३९११ (१७-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजभाषा “मराठी” ला शिक्षण व्यवस्थेत निश्चित स्थान देण्यासाठी विधीमंडळाने कायदा संमत केला असून सदरहू कायद्यानुसार केंद्रीय, आंतरराष्ट्रीय आणि राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमांच्या शाळांना मराठी भाषा शिकविणे अनिवार्य व सक्तीचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून करण्याबाबत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच कायद्याची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाच्या दिनांक १ जून, २०२० च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून महाराष्ट्र राज्यात राज्यातील सर्व शाळांमध्ये अध्यापन व अध्ययनामध्ये कायद्यान्वये मराठी भाषा सक्तीची करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निर्देशकांना सेवेत कायम करणेबाबत

**(२४) ३९१२ (१५-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१० च्या आदेशानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ३३४ निर्देशकांना दोन वर्षासाठी नियुक्ती देण्यात आल्यानंतर दोन वर्षाची मुदतवाढ देवून एकूण चार वर्षाच्या सेवेनंतर सन २०१४ मध्ये त्यांना कार्यमुक्त करण्यात आले, कार्यमुक्तीनंतर पुन्हा सर्व ३३४ निर्देशकांना मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने सेवेत घेण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंत्राटी पध्दतीवर ३३४ कार्यरत निर्देशकांना राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये रिक्त असलेल्या पदांवर नियमित सेवेत सामावून देण्याबाबतची शिफारस मंत्रिमंडळ उपसमितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील निर्देशकांची रिक्त असलेली ७०० पदे स्पर्धा परीक्षेव्दारा भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे मागील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या अनुभव प्राप्त कंत्राटी निर्देशकांवर अन्याय होत असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी निर्माण झाली असून उक्त ३३४ कंत्राटी पध्दतीवर कार्यरत निर्देशकांना नियमित सेवेत सामावून घेवून उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत शासन फेरविचार करून तसेच त्याबाबतचे सुधारित आदेश काढून अन्यायग्रस्त निर्देशकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२४-०७-२०२०) : (**१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) मंत्रिमंडळ उप समितीच्या शिफारशीप्रमाणे प्रस्ताव मा.मंत्रिमंडळासमोर आणण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कॉन्व्हेंटच्या शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(२५) ३९४० (१५-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या काळात कॉन्व्हेंटच्या शिक्षकांना वेतन देण्यास संस्थाचालकांकडून दिरंगाई होत असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक (प्राथमिक व माध्यमिक), पुणे यांना दिनांक १७ एप्रिल, २०२० रोजी पत्र पाठवून शासन निर्णयाची अंमलबजावणी केली जात नसल्याबाबतची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-०८-२०२०) :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) सदर प्रकरणी आयुक्त (शिक्षण) यांनी दिनांक १५/४/२०२० रोजी तसेच शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी दिनांक २०/४/२०२० रोजी अधिनस्त कार्यालयांना सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांचे शिक्षण टप्प्याटप्प्याने सुरू करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देण्याबाबत

**(२६) ३९४४ (१७-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने कोविड-१९ चा लॉकडाऊन शिथिल केल्यानंतर राज्यातील शाळांचे शिक्षण टप्प्याटप्प्याने सुरू करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना देणारे परिपत्रक दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिपत्रकात शालेय शिक्षण विभागाने स्वत:कडे कोणतीही जबाबदारी न घेता सर्व जबाबदारी पालक/शिक्षक व संस्था चालकांवर विभागून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मार्गदर्शक सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव विविध गावा-गावात कमी जास्त प्रमाणात आहे. शैक्षणिक संस्था ज्या गावात असेल त्या गावातील स्थितीचे ज्ञान स्थानिक लोकांना असल्यामुळे शाळा सुरू करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती यांच्या मान्यतेने संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(२७) ३९५६ (१५-०७-२०२०). श्री.कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे, परंतु त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजनेचा प्रत्यक्ष लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१) व (२) सातव्या वेतन आयोगात बक्षी समितीने केवळ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० वर्षाच्या सेवेनंतर देय होणारी तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शिफारस केलेली आहे. शिक्षकांना सदर योजना लागू करण्याबाबत शासनाने दिनांक ३१/७/२०१९ रोजी अभ्यासगट नेमलेला आहे.
(३) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगात १०, २० व ३० वर्षाच्या सेवेनंतर देय होणारी तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोनाच्या संसर्गामध्ये शाळा सुरु न करण्याबाबत

**(२८) ३९७३ (१५-०७-२०२०). श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ च्या आजाराचे वॅक्सिन येत नाही तोपर्यंत शाळा सुरू करू नयेत अशी मागणी पालक व विद्यार्थी यांनी केली असून याबाबत पालक व विद्यार्थी यांनी ऑनलाईन पिटीशन दाखल केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२४-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

Parents Teacher Association of United Forum या संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक १५ जून, २०२० च्या शासन निर्णयातील काही तरतुदींना विशेषतः इयत्ता दुसरी पर्यंत ऑनलाईन शिक्षणाची संबंधित तरतुदीस आव्हान दिले असले तरी, त्यात अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर, वर्धा व अमरावती जिल्ह्यात टोळधाडीच्या प्रादुर्भावामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२९) ३९८२ (१६-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर जिल्ह्यातील काटोल, नरखेड, सावनेर, कळमेश्वर, नागपूर ग्रामीण, वर्धा जिल्ह्यातील आष्टी तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड, मोर्शी, चिखलदरा भागात टोळधाडीने मोठ्या प्रमाणात शिरकाव केल्याचे माहे मे, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोळधाडीकडून नागपूर, वर्धा व अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे देखील नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन टोळधाडीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवणे व शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाईबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२८-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

नागपूर व अमरावती जिल्हयात अत्यल्प प्रमाणात नुकसान झाले आहे.

(३) टोळधाड प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रादुर्भावित क्षेत्रात सामुहिक फवारणी, टिनाचे डब्बे, ढोल वाजवणे, ट्रॅक्टर व मोटर सायकलचे सायलेन्सर काढून शेतात मोठ्याने आवाज करुन किडींना हुसकावून लावणे, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्लोरोपायरीफॉस या कीड नाशकाची अग्निशमन बंब, एचटीपी पावर स्प्रेअर व ट्रॅक्टर चलित फवारणी पंपाच्या तसेच ड्रोनच्या साहाय्याने फवारणी करण्यात आली. नागपूर व अमरावती जिल्हयात टोळधाडीच्या प्रादुर्भावामुळे शेतीपिकाचे / फळबागेचे ३३ टक्केच्यावर नुकसान झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील परिवहन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) ३९९४ (१५-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभागातील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (डेप्युटी आरटीओ) आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ) यांची पदे रिक्त असल्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अनेक कामे प्रलंबित आहे, तसेच परिवहन विभागातील उपप्रादेशिकांच्या ५५ पदांपैकी ११ पदे आणि काही सहाय्यक प्रादेशिकांच्या १०० पदांपैकी ५० पदे रिक्त असून उपप्रादेशिक अधिकारी पदांवरील पदोन्नतीही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात १५ ठिकाणी प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांच्यासह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यरत आहेत, तर काही जिल्हयात प्रादेशिक परिवहन कार्यालयाची जबाबदारी ही फक्त उपप्रादेशिक अधिकारी आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवरच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी त्या-त्या जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय प्रमुख असूनही या पदासाठी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी येत असल्याने वाहन नोंदणी लायसन्स (अनुज्ञाप्ती) परवाना, वाहन कर यासह अनेक कामे या दोन्ही अधिकाऱ्याच्या अखत्यारीत होत असतात, मात्र मुंबईसह विदर्भ, मराठवाडा आणि अन्य काही भागात अनेक जिल्ह्यात उपप्रादेशिक परिवहन आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नसल्याने एका जिल्ह्याच्या अधिकाऱ्याकडे दुसऱ्या जिल्ह्याचा कार्यभार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील परिवहन विभागातील रिक्त पदे न भरल्यामुळे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदावरील पदोन्नतीही प्रलंबित असल्याने दिनांक ३० मे, २०१९ रोजी पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्र अधिकाऱ्यांच्या नावांची अंतिम यादी मान्यतेकरीता सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली असून विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीपूर्वी सेवाजेष्ठता यादी सामान्य प्रशासन विभागाने मान्य केली असूनही रिक्त पदे व पदोन्नती प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त संदर्भातील प्रस्ताव मा.परिवहन मंत्री यांच्या विभागाकडे मागील ४ महिन्यांपासून प्रलंबित असून याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही, तसेच पदोन्नती समितीच्या बैठकीस १ वर्षाहून अधिक कालावधी होवूनही पदोन्नती आदेश जारी केले नसल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कामे प्रलंबित असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील परिवहन विभागातील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, तसेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या सर्व रिक्त जागा आणि प्रलंबित असलेले पदोन्नती आदेश विनाविलंब काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२७-०७-२०२०) :** (१) मोटार वाहन विभागामध्ये सद्य:स्थितीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाची एकूण ५६ पदे मंजूर असून त्यापैकी ४५ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. तसेच सहाय्यक

प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाची एकूण १०० पदे मंजूर असून त्यापैकी ५५ पदे भरलेली व ४५ पदे रिक्त असून सन २०१९-२०२० या निवडसूची वर्षासाठी २४ अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली असून पदस्थापना देण्याची बाब कार्यवाही खाली आहे.

(२) व (३) होय.

पदोन्नतीमधील मागास प्रवर्गाचे आरक्षण या न्यायालयीन प्रकरणामुळे शासनाने दिनांक २९/१२/२०१७ चे पत्रानुसार पदोन्नतीमध्ये मागास प्रवर्गाची पदे रिक्त ठेवावीत आणि फक्त खुल्या प्रवर्गातील पदे भरावीत असे आदेश दिलेले असल्याने रिक्त असणाऱ्या पदांवर अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(४), (५) व (६) सामान्य प्रशासन विभागाने सन २०१८-२०१९ च्या निवडसूचीतील ३ पदे पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिली होती त्यानुसार संबंधितांचे पदोन्नती आणि पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सन २०१९-२०२० च्या निवडसूचीतील ५ पदे पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिली आहे त्यापैकी १ पदावरील पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आले असून उर्वरीत पदावरील पदोन्नती /पदस्थापनेचा प्रस्ताव कार्यवाही खाली आहे.

---

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आकृतिबंधाचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(३१) ४०१२ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाने सुधारित १७५ शिक्षक पदांचा व ३८५ शिक्षकेतर कर्मचारी पदांचा आकृतिबंधाचा प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी शासनास माहे डिसेंबर, २०१८ व माहे जानेवारी, २०१९ मध्ये सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास सादर केलेला प्रस्ताव मान्य करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी व सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू महोदयांनी शासनास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या विनंतीप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने सादर केलेला प्रस्ताव मान्य करण्याऐवजी सदरील प्रस्तावाच्या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शासनास सादर केलेला १७५ शिक्षक पदांचा व ३८५ शिक्षकेतर कर्मचारी पदांचा सुधारित आकृतिबंधाचा प्रस्ताव मंजूर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२५-०८-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नातील नमूद विद्यापीठाने दिनांक ११/१२/२०१८ व दिनांक ०८/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये १७५ शिक्षकीय पदांचा व दिनांक २५/३/२०१९ अन्वये ३८५ शिक्षकेतर पदांचा आकृतिबंधाचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) आकृतिबंधाच्या प्रस्तावावर दिनांक ०१/११/२०१८ रोजी सचिव स्तरावर सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलसचिव यांची बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीमध्ये विद्यापीठांनी पाठविलेले आकृतिबंधाचे प्रस्ताव वित्त विभाग, शासन परिपत्रक, दिनांक २९ जून, २०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार नसल्याने वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रस्ताव सुधारित करून संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करण्याबाबत सर्व अकृषी विद्यापीठांना सूचित करण्यात आलेले आहे. तसेच याबाबत सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनादरम्यान दिनांक १७/१२/२०१९ रोजी नागपूर येथे बैठक घेऊन विद्यापीठ अनुदान आयोग व इतर शिखर संस्थांच्या मानकानुसार अचूक कार्यभार परिगणित करून प्रत्येक पदाच्या समर्थनासह सुधारित प्रस्ताव सादर करण्यास संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ०१/०१/२०२० रोजीच्या पत्रानुसार सर्व अकृषी विद्यापीठांना सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंडणगड व दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा उभारण्याबाबत

**(३२) ४०१६ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेळास गाव, बाणकोट पानबुरूज (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथून जोडणाऱ्या मार्गावरील समुद्र किनाऱ्यावर व दापोली तालुक्यातील मौजे आडे, पाडले, आंजर्ला येथे समुद्रधुप प्रतिबंधक बंधारा व मौजे मुरुड, कर्दे येथे धुप प्रतिबंधक बंधारा उभारण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी गत सुमारे १० वर्षाहुन अधिक कालावधीपासून मा.बंदरे मंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, पतन अभियंता, रत्नागिरी, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री आदींकडे लेखी निवेदनाव्दारे तसेच प्रत्यक्ष भेट घेवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ठिकाणी समुद्रकाठावरून जाणाऱ्या १ कि.मी लांबीच्या मार्गावर संरक्षक बंधारा उभारण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी पतन विभागाकडे केली असतानाही सदरहू मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावित्री नदीला येणाऱ्या पूरामुळे बाणकोट पाणबुरूज ते वेळासपर्यंतचा मार्ग पावसाळयात पूर्णपणे पाण्याखाली जात असून समुद्राला येणाऱ्या भरतीच्या पाण्याने रस्त्याची ठिकठिकाणी दुरवस्था झाली असल्यामुळे पतन विभागाने संरक्षक बंधारा बांधला तर रस्त्यांची होणारी दुरवस्था थांबेल आणि त्यामुळे वाहतुकीस खंडही पडणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त ठिकाणी समुद्र धुपप्रतिबंधक बंधारा बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२४-०७-२०२०) :** (१) व (२) होय, मौजे कर्दे भाग १, पाडले भाग १ येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे ही कामे पूर्ण झाली आहेत. आंजर्ला येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे हे काम प्रगतीपथावर आहे तसेच मौजे मुरुड धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे हे काम सन २०२०-२०२१ चे अर्थसंकल्पात मंजूर आहे. मौजे आडे येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) व (४) वेळास ते बाणकोट समुद्र काठावरुन जाणाऱ्या २ कि.मी. लांबीच्या मार्गावर बंधाऱ्याची आवश्यकता आहे. सदर काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जलस्त्रोतांची तपासणी करण्याबाबत**

**(३३) ४०५५ (१५-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७३ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षणात राज्यातील सर्वच सार्वजनिक जलस्त्रोतांच्या पाण्याचे नमुने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून तपासून दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी कोरोना महामारीच्या संकटामुळे माहे मे अखेरपर्यंत राज्यातील दोन लाख जलस्त्रोतांपैकी केवळ ६२ हजार जलस्त्रोतांच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे गेले आहेत, राज्यातील दीड लाख जलस्त्रोतांच्या पाण्याच्या नमुन्याची गुणवत्तेच्या आधारावर तपासणीच झाली नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून यात सर्वाधिक मराठवाड्यातील ६३ हजार पाणी नमुन्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाण्याच्या गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली तपासणी पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

जिल्हा परिषदेमार्फत गोळा करुन प्रयोगशाळेत सादर करण्यात आलेल्या नमुन्यांची भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून तपासणी केली जाते.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०२०-२०२१ या वर्षात माहे मे, २०२० अखेर ६३,३२५ पाणी नमुन्याची तपासणी करण्यात आली होती. तथापि, सद्य:स्थितीत जून, २०२० अखेर १,६२,८६० इतक्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे. विभागनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | नमुना तपासणी |
|---|---|---|
| १ | पुणे | २७२५२ |
| २ | कोकण | १७४०८ |
| ३ | नाशिक | ३२०२३ |
| ४ | औरंगाबाद | १६८३३ |
| ५ | अमरावती | १५८०२ |
| ६ | नागपूर | ५३५४२ |
| | एकूण | १६२८६० |

(३) सध्या नमुने संकलन करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फ़त प्रगतीपथावर आहे. तथापि, कोरोना (कोविड-१९) प्रादुर्भावामुळे कमी प्रमाणात नमुने प्राप्त झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर सुपर स्पेशालीटी रुग्णालय व शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथील सीटी स्कॅन व एमआरआय मशीन कार्यान्वित करुन देण्याबाबत

**(३४) ४०८७ (१७-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५४९ ला दिनांक १ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील सुपर स्पेशालीटी रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडीकल) येथील सीटी स्कॅन व एमआरआय मशीन बंद असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ४ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोना सारखे गंभीर आजार उध्दवले असताना सदर यंत्र बंद असल्याने रुग्णाची गैरसोय होवून रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथील सुपर स्पेशालीटी रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडीकल) येथील सीटी स्कॅन व एमआरआय मशीन कार्यान्वित करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२१-०८-२०२०) :** (१) नागपूर येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील सीटी स्कॅन ही यंत्रसामुग्री दिनांक २८/०५/२०२० रोजी बंद पडली होती. सदर यंत्रसामुग्री दिनांक ०३/०६/२०२० रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयात एमआरआय ही यंत्रसामुग्री उपलब्ध नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सीटी स्कॅन या यंत्रामध्ये दिनांक १५/०५/२०२० रोजी बिघाड झाला होता. लॉकडाऊन कालावधीत यंत्राच्या दुरूस्तीकरीता आवश्यक असणारे भाग उपलब्ध होण्यास अडचण आली. तथापी, सदर यंत्रसामुग्री दिनांक २६/०६/२०२० रोजी दुरूस्त करण्यात आले. सदर संस्थेतील एमआरआय या यंत्रसामुग्रीचे आयुर्मान संपुष्टात आल्याने सदर यंत्रसामुग्री दिनांक १३/०३/२०२० पासून बंद आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर दोन्ही संस्थेतील सीटी स्कॅन यंत्रसामुग्री कार्यान्वित आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर संस्थेसाठी एमआरआय खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर यंत्रसामुग्री खरेदीबाबतची कार्यवाही हाफकीन महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे धोरणात्मक निर्णय प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(३५) ४०९८ (१५-०७-२०२०). श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात मोठे प्रवासी महामंडळ असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा कारभार सध्या अतिरिक्त कार्यभार असलेल्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा परिणाम महामंडळाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेला होत असल्याने निर्णय प्रक्रिया संपूर्णपणे प्रलंबित आहे, तसेच कोरोना काळात काम करुनही कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा कारभार सुरळीतपणे सुरू करण्यासाठी तसेच धोरणात्मक प्रलंबित असलेले निर्णय मार्गी लावण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२७-७-२०२०) :** (१) होय, पदोन्नतीमधील आरक्षण या न्यायालयीन प्रकरणांमुळे फक्त खुल्या प्रवर्गातील जागा भरण्याचे शासनाचे आदेश असल्याने आरक्षित रिक्त पदांवर अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळातील कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खाते प्रमुख, विभाग प्रमुख यासारख्या महत्वाच्या रिक्त पदांवर लगतच्या पदावरील उपलब्ध अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. करार तत्वावर नेमणुकीवर असलेले महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) व नियोजन व पणन यांची १ वर्षाची मुदत दिनांक ३१/०५/२०२० रोजी समाप्त झाल्याने व पुढील वर्षाकरीता मुदतवाढ न मिळाल्याने व कोरोना कालावधीत महामंडळाचे कामकाज सुरु असल्याने तातडीने उपमहाव्यवस्थापक (क. व औ.सं.) यांचेकडे महाव्यवस्थापक (क. व औ.सं.) व महाव्यवस्थापक (भां. व ख.) हे रजेवर असल्याने उपमहाव्यवस्थापक (भांडार) तसेच महाव्यवस्थापक (निवप) या पदाचा अतिरिक्त कार्यभार महाव्यवस्थापक (वाहतूक) यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

कोरोनाच्या काळातही महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आल्याने महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रक्रिया प्रलंबित नाही.

१. माहे मार्च, २०२० देय एप्रिल, २०२० चे वेतन शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ३१/०३/२०२० अन्वये कर्मचाऱ्यांच्या प्रवर्गाप्रमाणे ५०, ७५, १०० टक्के अदा करण्यात आलेले आहे.
२. माहे एप्रिल, २०२० देय मे, २०२० चे वित्त विभाग, दिनांक २२/०४/२०२० अन्वये अदा करण्यात आलेले आहे.
३. माहे मे, २०२० देय जून, २०२० चे वेतन राज्य परिवहन महामंडळ पत्र दिनांक २४/०६/२०२० अन्वये ५० टक्के अदा करण्यात आलेले आहे.
४. माहे जून, २०२० देय जुलै, २०२० चे वेतन निधी कमतरतेमुळे अदयापपर्यंत अदा करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील मेयो रूग्णालयाच्या इमारतीबाबत

**(३६) ४१२६ (१७-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेयो रुग्णालयामधील शिकस्त वॉर्डामुळे रूग्ण सोईंपासून वंचित असल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयामधील शिकस्त झालेल्या वॉर्डाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लेखापरिक्षण होऊन त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन इमारत दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२१-०८-२०२०) :** (१) सदर रुग्णालयातील बऱ्याच इमारती जवळपास १३५ वर्ष जुन्या असून जीर्ण अवस्थेत असल्यामुळे सुरक्षेच्यादृष्टीने या इमारतीमधील रुग्ण संस्थेतील सुस्थितीत असलेल्या इतर रुग्ण कक्षांमध्ये स्थानांतरीत करण्यात आलेले आहेत.

(२) सदर संस्थेचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व्हीएनआयटी या शासकीय संस्थेव्दारे करण्यात आलेल्या लेखा परिक्षणचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

(३) या संदर्भात सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संस्थेस भेट दिलेली आहे. याबाबत संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाशी करण्यात आलेल्या चर्चेनुसार शिकस्त इमारतीच्या बळकटीकरणासाठी येणारा खर्च व खर्चाच्या तुलनेत शिकस्त इमारतीचे आयुष्यमान फार जास्त वाढणार नाही, ही बाब निदर्शनास आल्याने सदर इमारती जमीनदोस्त करण्याचे संस्थेव्दारे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील अस्थायी कर्मचारी आरोग्य विम्याविना कार्यरत असल्याबाबत

**(३७) ४१५३ (१५-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात टाळेबंदी शिथिल केल्यानंतर मुंबई विद्यापीठातील तृतीय आणि चतुर्थ श्रेणीतील १२०० अस्थायी कर्मचाऱ्यांना दिनांक ७ जून, २०२० पासून कामावर रुजू होण्याचे आदेश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अस्थायी कर्मचाऱ्यांना विद्यापीठाकडून तुटपुंजे वेतन अदा करण्यात येत असून त्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ओळखपत्र, तसेच आरोग्य विम्याचे संरक्षण नसल्याने या कर्मचाऱ्यांना सद्य:स्थितीत मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार मुंबई विद्यापीठातील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील अस्थायी कर्मचाऱ्यांना समान वेतन अदा करण्यासह कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ओळखपत्र, तसेच आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनाने कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावामुळे लागू केलेल्या लॉकडाऊननंतर सुरू केलेल्या "मिशन बिगिन अगेन" नुसार दिनांक ०८/०६/२०२० पासून विद्यापीठाचे कामकाज १५ टक्के उपस्थितीनुसार सुरू झालेले आहे.

(२) व (३) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तापमानाची नोंद, ठिकठिकाणी सॅनिटायझनची व्यवस्था, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी बैठक व्यवस्थेमध्ये बदल, परिसर निर्जंतुकीकरण व जास्तीत जास्त कामे/नस्ती ऑनलाईन सादर करणे इ. दक्षता घेतल्या जात आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ५ (११) मधील तरतुदीनुसार विद्यापीठास त्यांच्या निधीतून पदे निर्माण करणे, सेवाशर्ती, वेतन इ. बाबी विहित करण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत. त्यानुसार विद्यापीठ आवश्यकतेनुसार पदे निर्माण करून त्यांचे वेतन विहित करते. हंगामी कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ठरविले जाते व विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठातील हंगामी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वेळोवेळी वाढ केलेली आहे. विद्यापीठामध्ये कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सहा किंवा तीन महिन्यांसाठी खंड देऊन हंगामी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्याच्या नियुक्तीच्या कालावधी हा हंगामी असल्याने त्या कालावधीसाठी विद्यापीठाकडून ओळखपत्र दिले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उज्वला लाभार्थीना शिधापत्रिकेवर केरोसिन देण्याबाबत**

**(३८) ४१८० (१५-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उज्वला योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे गॅस सिलेंडर आहे, परंतु आर्थिक क्षमता नसलेल्या लाभार्थ्यांना ते पुन्हा भरण्याची क्षमता नाही, अशा नागरिकांना शिधापत्रिकेवर केरोसिन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, तसेच त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२४-०७-२०२०) :** (१), (२) व (३) जनहित याचिका क्र.१६/२००४ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ०७/०१/२०१६ रोजी अनुदानित दराचे केरोसिन केवळ बिगर गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच वितरीत करण्याचे आदेश दिलेले आहेत.

सदर आदेशाच्या अनुषंगाने गॅसधारक शिधापत्रिकाधारकांनाही केरोसिन वितरीत करता येईल किंवा कसे याबाबत मा.उच्च न्यायालयास पुनर्विचार करणे बाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करण्यात आला असून याबाबत विधी व न्याय विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात मोफत तांदुळ नियमाप्रमाणे वाटप न झाल्याबाबत

**(३९) ४२२४ (१७-०७-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड १९ विषाणूच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी लागू केलेल्या संचारबंदीत जनतेला जीवनावश्यक वस्तुंचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने स्वस्त धान्य दुकानांमार्फत माणशी ५ किलो तांदुळ वाटप करण्याचे आदेश माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात लाभार्थ्यांना माणशी ५ किलो तांदुळ न मिळाल्याने या वाटपात गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२४-०८-२०२०) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरातील वक्फ मालकीच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(४०) ४२६६ (१५-०७-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील सर्व्हे नं. ६३६ व ६३७ मधील १०० एकर जमिनीवर महानगरपालिकेची परवानगी न घेता बांधकाम करुन अतिक्रमण केल्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी लेखी निवेदनाव्दारे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे खोटे दस्ताऐवज बनवून बांधकाम परवाने मिळविणाऱ्या दोषींविरूध्द कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बांधकाम परवानगी कागदपत्रे, खोटे दस्ताऐवज व इतर गैरप्रकारांची चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच विनापरवाना बांधकाम केलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, उक्त कामांची कामनिहाय माहिती काय आहे तसेच विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२४-०७-२०२०) :** (१) होय.

(२) खोटया दस्ताऐवजा आधारे कोणतेही बांधकाम मंजूर करण्यात आलेले नाही. तथापि, इदगाह मैदानावर अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार १७ अनधिकृत टिनशेड दुकानांना सन २०१६ मध्ये महापालिकेकडून नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. सदर नोटीसांविरुध्द अतिक्रमण धारकांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सी. आर. ए. क्र.३०/२०१९ दाखल केले असून दिनांक १२/०२/२०१९ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने “जैसे थे परिस्थिती ठेवणे” बाबत दिलेले आदेश दिनांक १७/०२/२०२० च्या आदेशान्वये पुढे सुरु ठेवण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असा अहवाल आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज वाटप होत असल्याबाबत

**(४१) ४२७९ (१५-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः विदर्भात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, अकोला, अमरावती येथील मराठा समाजातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा ह्या दृष्टीकोनातून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांतर्गत विविध कर्ज योजना लागू करूनही बेरोजगार युवकांना बॅका कर्ज मंजूर करीत नसल्याने बेरोजगार लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळानी कर्जाच्या फाईली मंजूर करुनही बँका कर्ज देत नसून फक्त तारण देणाऱ्यांना कर्ज देतात तसेच यातील बहुतांश कर्ज वाटप हे जुन्या खातेदारांनाच देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्यांना जास्त कर्जाची गरज नाही अशा गरजूंना थेट कर्ज योजनेमधून किमान ५०,०००/- रुपये कर्ज योजना चालू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज मंजूर करुनही बँकाकडून कर्ज वाटप करण्यास विलंब होत असून अशा राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्ज वाटपाबाबत होणाऱ्या विलंबाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कर्ज वाटप विनाविलंब करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (२४-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुख्याध्यापकाची सेवानिवृत्तीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(४२) ४३०८ (१५-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्याध्यापकांच्या सेवानिवृत्ती प्रकरणावर संस्था स्वाक्षरी करीत नसल्याने सदरहू प्रकरणे शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठवित येत असून त्यांच्याकडून पैशाची मागणी करीत असल्याने अशा प्रकरणात शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी स्वतः प्रती स्वाक्षरी करुन मुख्याध्यापकांची सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढावीत यासोबत इतर मागण्यांबाबतचे निवेदन मुख्याध्यापक संघटनेनी शासनाकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-०८-२०२०) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतनाची थकबाकी मिळणेबाबत

**(४३) ४३११ (१७-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००५ मध्ये अंशतः अनुदानित शाळेच्या कर्मचाऱ्यांना डी.सी.पी.एस. खाते न मिळाल्याने कपात बंद असणे तसेच सहाव्या वेतन आयोगाची सन २००६ व २००९ पर्यंतची थकबाकी न मिळाल्याने शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांना अमरावती विभाग शिक्षक आघाडीने निवेदनाव्दारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ मध्ये अनुदानित शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याविषयी वारंवार मागणी होऊन सुध्दा त्या मागणीकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१), (२) व (३) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यासाठी शिक्षक संचालक (प्राथमिक) यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतरांचे नियमित वेतन मिळण्याबाबत

**(४४) ४३२२ (१५-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या व इतर माध्यमांच्या विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यीत शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतरांच्या नियमित वेतन मिळण्याबाबत शिक्षक क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाकडे दिनांक ६/५/२०२० रोजी निवेदनाव्दारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विनंतीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०८-२०२०) :** (१), (२) व (३) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, शासनाने दिनांक २७/५/२०२० रोजी राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळामधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन अदा करण्याबाबत सर्व शाळा व्यवस्थापनास सूचना देण्याबाबत शिक्षण संचालक, प्राथमिक/माध्यमिक यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना निवृत्तीवेतन लागू करणेबाबत**

**(४५) ४३५६ (१५-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांमध्ये सन १९९१ ते २००० या दरम्यान विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड झालेल्या व यूजीसीने नेट/सेट मधून सूट दिलेल्या प्राध्यापकांना निवृत्तीवेतन दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ ते ३० वर्षे नियमित सेवा करून तसेच मा.उच्च न्यायालयाचा निकाल व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्तीवेतन सुरू करण्याबाबतचा आदेश असूनही निवृत्तीवेतन लागू न झाल्यामुळे प्राध्यापकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्त प्राध्यापकांना निवृत्तीवेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१३ अन्वये शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून काही अटींच्या अधीन राहून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात आल्या आहेत. त्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार अशा अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.१३१६६/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०३/१०/२०१८ व याचिका क्र.७५५/२०१९ मध्ये दिनांक ०९/०४/२०१९ रोजी याचिकाकर्ते यांना निवृत्तीवेतन सुरू करण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत व सदरहू आदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केले असल्यामुळे मा.न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. तसेच ज्या प्रकरणामध्ये मा.न्यायालयाने याचिकाकर्ते यांना निवृत्तीवेतन सुरू करण्याबाबतचे आदेश पारित केलेले आहेत त्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औदयोगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ट्रेडची क्षमता वाढविण्याबाबत

**(४६) ४३५८ (१७-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जास्त मागणी असणाऱ्या ट्रेडला क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त होत असल्याने अशा ट्रेडची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,

(२) तसेच बहुतांश औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये वसतिगृह, घर कार्यान्वित नसल्यामुळे विद्यार्थांना येण्या जाण्याचा भुर्दंड सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसतिगृह कार्यान्वित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (११-०८-२०२०)** : (१) औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जास्त मागणी असणाऱ्या ट्रेडला क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त होत असल्याने अशा ट्रेडची क्षमता वाढविण्यासाठी विद्यमान औदयोगिक प्रशिक्षण संस्थामधील उपलब्ध पायाभूत व प्रशिक्षण सुविधांचा १००% विनियोग होण्याच्या दृष्टीने

विस्तार आराखडा तयार करण्यात आलेला आहे व जास्त भांडवली गुंतवणूक आवश्यक असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्याचा निर्णय देखील घेण्यात आलेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यात सध्या १९९ वसतिगृह कार्यान्वित असून त्यांची एकूण प्रवेशक्षमता १६,२३५ एवढी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ऑनलाईन शिक्षणासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४७) ४४२८ (१५-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या अनुषंगाने ऑनलाईन शिक्षणावर राज्य शासनाने भर दिला असून याच ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक असणारा टॅब शेतकरी असलेले वडील घेऊ न शकल्याने भोजगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचा प्रकार दिनांक १९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास घडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊन काळात ऑनलाईन शिक्षणाचा खर्च करण्याची ज्यांची परिस्थिती नाही, तसेच गेवराई सारखे प्रकार घडू नये यासाठी शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय, शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही. विद्यार्थ्याने इयत्ता १० वी ची परीक्षा मार्च, २०२० मध्ये दिली असल्याने व इयत्ता १० वी चा निकाल लागलेला नसल्याने ऑनलाईन शिक्षणासाठी टॅब घेण्याची आवश्यकता नव्हती.

(२) होय, विविध संकेतस्थळे, सह्याद्री वाहिनी, रेडीओ तसेच दिक्षा ॲप च्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील भांडारपाल व अधीक्षकाची पदे पुनर्स्थापित करण्याबाबत**

**(४८) ४५१० (१५-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कौशल्य विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तांत्रिक विद्यालयातील भांडारपाल व भांडार अधीक्षक ही पदे दिनांक ३० सप्टेंबर, २००६ च्या शासन निर्णयानुसार पदाच्या आढाव्यामध्ये कमी करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नवीन धोरणानुसार कौशल्य विकासाला चालना मिळण्यासाठी रोजगाराभिमूख व्यवसायाची नव्याने निर्मिती केल्यामुळे औद्योगिक संस्थांमध्ये युनिट वाढविण्यात आल्याने एकाच कर्मचाऱ्यावर कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी आल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला असून त्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयातील ६ विभाग (कौशल्य विकास व उद्योजकता विभाग) लेखाशीर्ष २२३० व २२०३ सीटीएस योजना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील भांडारपाल व भांडार अधीक्षक ही पदे डीजीईटी दिल्लीच्या निकषानुसार निर्माण केलेल्या पदाच्या आढाव्यात निम्म केलेले पद पुनर्स्थापित करावयाची कार्यवाही व जुन्या आकृतिबंधावर असलेली स्थगितीवरील बंदी उठविण्याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या आशयाचे एक निवेदन महाराष्ट्र राज्य भांडार संवर्ग कर्मचारी संघटना यांनी दिनांक ६ जून, २०२० रोजी वा तत्पुर्वी मा.कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री, मा.कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री, अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उक्त पदांच्या आढाव्यात भांडारपालांना सहाय्यक भांडारपाल ठरविण्यात आले असल्याने पदाच्या आढाव्यात कमी केलेली भांडारपाल व अधीक्षकांची पदे पुनर्स्थापित करुन जुन्या आकृतिबंधावर असलेली स्थगिती उठविण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी सुध्दा दिनांक २३ जून, २०२० रोजी शासनास निवेदन पाठवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (१८-०८-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) वरील १ ते ४ वरील उल्लेखित बाबी विचारात घेऊन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील पदांचा सुधारित आकृतिबंधावर कार्यवाही सुरु आहे.

---

## उस्मानाबाद जिल्हा नियोजन समितीमार्फत नगर विकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) ४५२५ (१६-७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षातील जिल्हा नियोजन समितीमार्फत नगर विकास शाखेस प्राप्त निधीच्या विनियोगात गैरव्यवहार झाल्याची बाब जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आली असता सदर प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २७ जानेवारी, २०२० रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणाच्या चौकशीसाठी अप्पर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली देखील एक स्वतंत्र चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समित्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, उक्त अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच अहवालातील शिफारसीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-८-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधीत समित्यांचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना प्राप्त झालेला आहे.

अप्पर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार तत्कालीन जिल्हा प्रशासन अधिकारी तथा तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना यापुर्वीच म्हणजे दिनांक २९/०१/२०२० रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.

अप्पर विभागीय आयुक्त-१, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानुसार चौकशीतील मुद्यांच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या विरुध्द आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विद्यापीठांमधील अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत

**(५०) ४५३८ (१५-०७-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठांमधील अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परिक्षांचे काय नियोजन केले वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) कोविड-१९ या जागतिक महामारीच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यापीठांच्या अंतिम वर्षातील/अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरुन निकाल घोषित करुन पदवी प्रमाणपत्र

देण्याचा तसेच ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल, त्यांना परीक्षेला बसण्याची संधी देण्याचा निर्णय दिनांक १९ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.